देऊळगाव माळीच्या मातीत वाघ्या मुरळीच्या घुंगराचा नाद; राज्यस्तरीय वाघ्या मुरळी स्पर्धा उत्साहात संपन्न >>पान 2

मुंबई मंत्रालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न.. मुंबई पोलिसांच्या सतर्कतेमुळे युवकाचे वाचले प्राण.. >>पान 3

केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांच्या आयुष मंत्रालयाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद! >>पान 4

**सुविचार**

संसारातील सर्व शक्तिशाली वस्तू ही विचारशक्ती आहे.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



मी तुला खूप मिस करतेय... युजवेंद्रसोबत घटस्फोट अन् धनश्री झाली भावूक, खास व्यक्तीसाठी लिहिली पोस्ट

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 193 ■ रविवार, दि. 23 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# वाळूच्या वजनाने अंगावर शेड कोसळून झोपेत असलेले ५ कामगार जागीच ठार



**दैनिक आपला विदर्भ**

**जालना/प्रतिनिधी : अवैधरित्या वाळूचा उपसा करणाऱ्या टिप्परने थेट पत्र्याच्या शेडवर वाळू ओतल्यानं वाळूच्या ढिगाऱ्याखाली दबून पाच जणांचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास पासोडी परिसरात घडली. गावकऱ्यांनी वेळीच धाव घेतल्यानं वाळूच्या ढिगाऱ्याखालून एक लहान मुलीला सुखरूप बाहेर काढलं. इतर पाच जणांचा मात्र जागेवरच मृत्यू झाला आहे. जाफराबाद तालुक्यातील पासोडी शिवारात एका पुलाच्या कामासाठी हे मजूर आले होते.**

पुलाच्या बांधकामाच्या ठिकाणाजवळच असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये हे कुटुंब झोपलेले होते. पहाटे साडेतीन वाजता आलेल्या वाळूच्या टिप्परचालकानं वाळूचा टिप्पर पत्र्याच्या शेडवर रिचवल्यानं शेडमध्ये झोपलेले ६ जण ढिगाऱ्याखाली दबले.

घरात समोरच्या खोलीत झोपलेल्या महिलेच्या हा प्रकार लक्षात आल्यानं तिनं आरडाओरडा केला. त्यामुळे टिप्परचालकानं तिथून पळ काढला. महिलेनं आजूबाजूच्या गोठ्यावर जाऊन शेतकऱ्यांना बोलावून आणलं असता त्यांनी वाळू बाजूला करून पाच जणांना बाहेर काढलं. त्यापैकी एक १२ वर्षीय मुलीला वाचवण्यात यश आलं आहे. मात्र इतर पाच जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये गणेश काशिनाथ धनवई (वय -५० रा. गोळेगाव, ता. सिल्लोड ), भूषण गणेश धनवई (वय १७ रा. गोळेगाव, ता. सिल्लोड ), राजेंद्र दगडूबा वाघ (वय -४० रा. दहिद, ता. बुलढाणा) , सुनील समाधान सपकाळ, वय -२० रा. पद्मावती, ता. भोकरदन जि. जालना ), सुपडू आहेर, (वय ३८ रा. तोंडापूर, ता. जामनेर, जि. जळगाव ) अशी मृतकांची नावं आहेत. मृतक सर्वजण एकमेकांचं सख्खे नातेवाईक आहेत.

रवींद्र आनंद या ठेकदाराचं हे काम सुरु आहे. या कामासाठी स्वस्त वाळू उपलब्ध व्हावी या उद्देशानं ठेकेदार रात्रीच्या वेळी अवैध वाळू उपसा करून टाकत होता. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे पाच जणांचा मृत्यू झाला आहे, असा गावकऱ्यांनी आरोप केला.





पहाटे साडेतीन वाजता ही घटना घडली असता जाफ्राबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक इंगळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता स्थानिक गावकऱ्यांनी पंचनामा न करता मृतदेह ताब्यात घेऊ नये, असा पवित्रा घेतला. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा केला. अवैध वाळूचा विषय असल्यानं म हसूल पथकालाही पाचारण करण्यात आले, अशी माहिती पोलीस निरीक्षक इंगळे यांनी दिली. राज्यात वाळू उपसा बंदी असूनही अवैधरित्या सर्रास वाळू उपसा सुरू आहे. राजकीय वरदहस्त आणि पोलीस व महसूल अधिकाऱ्यांच्या आशीर्वादानं ठेकेदार मुजोर झाले आहेत, असा आरोप गावकऱ्यांनी केला.

## हिंदू धर्माचे रक्षण करणारे सगळे सत्तेत : नितेश राणे

**दैनिक आपला विदर्भ**

**सिंधुदर्ग/प्रतिनिधी :** हिंदू धर्माकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांना आईने घरी बसवले आहे अशी टीका मंत्री नितेश राणे यांनी विरोधकांवर केली ते सिंधुदुर्ग येथील आंगणेवाडी येथे भराडी देवीचा आशीर्वाद घेण्यासाठी आले असताना माध्यमाची बोलत होते. पत्रकारांशी वार्तालाप सत्तांना मंत्री नितेश राणे म्हणाले की, मी लहानपणापासून या जत्रेला येतो, या जत्रेमुळे एकंदरीत गाव एकत्र येते, हे या जत्रेचे वेगळेपण आहे. आमच्या कोकणामध्ये या जत्रेचं आगळंवेगळं आकर्षण आहे. त्यामुळे आमचे मुंबईकर चाकरमानी गावी येतात. एक वेगळे भक्तिमय वातावरण येथे असते.वर्षानुवर्षे या जत्रेसाठी भाविक लोक राज्याच्या कानाकोपऱ्यातून येत असतात. मी सुद्धा न चुकता सालाबाद प्रमाणे आईचे दर्शन घ्यायला आलो आहे. आईकडे ज्या ज्या वेळी काही मागितले त्या त्यावेळी भरघोस दिले आहे. २०२४ वर्षात भराडी देवीने आमचे राणे कुटुंब असो किंवा भाजप पक्ष असो आम्हाला भरभराटीने दिले आहे. आज आमच्या हिंदू धर्माचे रक्षण करणारे



>>पान २

## दहावीच्या पेपर फुटी प्रकरणात मोठी कारवाई, पोलिसांनी ठोकल्या तीन जणांना बेड्या

**दैनिक आपला विदर्भ**

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यातील बदनापूरच्या परीक्षा केंद्रावर मराठीचा पेपर फुटल्याचा प्रकार शुक्रवारी (दि. २१) उघडकीस आला. एकीकडे शिक्षणमंत्री परीक्षा केंद्रावर भेट देऊन कॉपीमुक्त अभियानाची पाहणी करत आहेत. तर दुसरीकडे दहावीच्या परीक्षेचा पहिलाच पेपर फुटल्याने शिक्षण वर्तुळात एकच खळबळ उडाली. या प्रकरणात शिक्षण अधिकारी मंगला धूपे यांच्या फिर्यादीवरून बदनापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. यात सीएससी केंद्र चालकासह एका इंग्रजी माध्यमातील शाळेच्या कर्मचार्याचा समावेश आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, गुरुवारी दहावी बोर्ड परीक्षा सुरू झाल्या असून पहिल्याच दिवशी मराठीचा पेपर फुटला. मराठीचा पेपर सुरु सकाळी ११ वाजता झाल्यानंतर काही वेळातच बदनापूर शहरातील सीएसी केंद्रावर उत्तर पत्रिकेची झेरॉक्स मिळत असल्याचे समोर आले आहे. मराठीचा पेपर सुरू झाल्यानंतर अवघ्या पंधरा मिनिटातच प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्राच्या बाहेर आल्याने शहरातील झेरॉक्स सेंटरमधून उत्तरपत्रिकांच्या प्रिंट काढून विद्यार्थ्यांना पुरवल्या जात होत्या. तर विद्यार्थ्यांना कॉपी पुरवण्यासाठी तरुणांची हुल्लडबाजी देखील देखील दिसून आली.

यानंतर शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांच्या फिर्यादीवरून बदनापूर पोलीस ठाण्यामध्ये रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला होता. शिक्षण मंडळाच्या आदेशानंतर जालना जिल्हा प्रशासनाने प्रकरणाचा तपास करत कारवाई केली आहे. बदनापूर येथील परीक्षा केंद्रावर दहावीच्या मराठी पेपरच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न हस्तलिखित करून व्हायरल केल्याप्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आहे. बदनापूर येथील ज्या सीएससी केंद्रावरून झेरॉक्स केल्या जात होत्या. त्या सीएससी केंद्र चालकासह, प्रश्नपत्रिकेतील प्रश्न व्हायरल करणाऱ्या एका इंग्रजी शाळेच्या कर्मचाऱ्याला देखील पोलिसांनी अटक केली आहे.

>>पान २

## ७० ते ८० क्विंटल द्राक्ष चोरून नेल्याची निफाड तालुक्यातील सारोळे खुर्द येथील घटना

**नाशिक/प्रतिनिधी :** एकीकडे द्राक्षांचे पैसे न देता द्राक्ष माल घेऊन पलायन करण्याच्या घटना घडत असताना आता दुसरीकडे चोरट्यांनी द्राक्ष बागेकडे मोर्चा वळवत चक्क ७० ते ८० क्विंटल द्राक्षांची चोरी केल्याची घटना निफाड तालुक्यातील सारोळे खुर्द येथे घडली आहे. राहुल वामनराव भोसले व जितेंद्र अशोकराव भोसले या दोन द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या द्राक्ष बागेतून चोरट्यांनी अंदाजे ७० ते ८० क्विंटल द्राक्ष चोरून नेल्याने द्राक्ष उत्पादकाला साडेचार ते पाच लाख रुपयांचा आर्थिक फटका बसला आहे या द्राक्ष चोरट्यांचा पोलिसांनी शोध घेत कठोर कारवाई करण्याची मागणी द्राक्ष उत्पादक शेतकरी करत आहे.



## अमली पदार्थाच्या शेतीवर स्थानिक गुन्हे शाखेची धाड; १२ कोटी ६० लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अफुच्या शेतीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकान धाड टाकून तब्बल १२ कोटी ६० लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा शिवारात २२ फेब्रुवारी रोजी करण्यात आली.

बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला अफूच्या शेतीविषयी गोपनीय माहिती मिळाली की देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा येथून काही अंतरावर असलेल्या एका शेतात अमली पदार्थ अफूची शेती केली जात आहे या माहितीवरून बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकली असता, संतोष मधुकर सानप हा इसम अवैधरित्या विनापरवानगी स्वतःच्या शेतात अंमली पदार्थ अफू ची शेती, संगोपन, करून बाळगतांना मिळून आला. शेतमालक संतोष मधुकर सानप यांच्या शेतातील १२ गुंठे क्षेत्रातून १२ कोटी ६० ला २८ हजार रुपयाची १५ क्विंटल ७२ किलो अफू जप्त केली. त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करून मुद्देमाल व आरोपी अंढेरा पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले.

सदर घटनेबाबत सरकारतर्फे आणि गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सचिन कानडे यांनी अंडेरा पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. सदर तक्रारीवरून आरोपी संतोष मधुकर सानप वय ४९ , रा. अंढेरा ता. देऊळगाव राजा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.सदर कारवाई पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे,

>>पान २

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार यांच्यात झालेला संवाद पाहून आम्ही सुखावलो : सुनिल तटकरे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी आजची बैठक पार पडली. २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री दिवस आहे.२७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिन आहे. त्याच्या पूर्वसंध्येला या कार्यक्रमाचा आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार यांच्यात झालेला संवाद पाहून आम्ही सुखावलो आहे. असे मत खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले.

यावेळी खासदार तटकरे म्हणाले की, ज्यांनी महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. शिल्पकार राम सुतार, मधुभाई कर्णिक, नाट्य आणि चित्रपटातील अशोक सराफ, भारतीय क्रिकेट दिलीप वेंगसरकर , वैशाली सामंत, इंद्रनील चितळे यांना सन्मानित करणार आहोत. मराठी गौरव भाषा दिन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने साजरा करणार आहोत. अशोक हांडे यांचा मराठी बाणा हा कार्यक्रम आयोजित केला आहे. या देशाची या राज्याची एक संस्कृती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार यांच्यात झालेला संवाद हा आम्हाला भावणार आहे.



पंतप्रधानांनी सुद्धा आदर व्यक्त केला मी त्यांचा आभार मानतो. अस्वस्थतेसाठी जे जन्माला आले. त्यांना अस्वस्थता वाटेल. पण जीवनात ज्यांचं मन स्वच्छ आहे. त्यांना अस्वस्थ वाटण्याचा कारण नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार यांचे संबंध पूर्वीचे आहेत. शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बारामतीला निमंत्रित केले होते.

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट च्या कार्यक्रमाला सुद्धा निमंत्रित केले होते. यावेळी सुद्धा मोदींनी पवार यांच्या संदर्भातील भावना व्यक्त केली होती. त्यांच बोट धरून मी राजकारणात आलो, असे मोदी म्हटले होते. काल सर्वकाही बघून आम्ही सुखावलो आहोत. विरोधकांना विचारणा करण्याचा लोकशाहीमध्ये अधिकार आहे. ९५ सालाच्या जुन्या खटल्यामध्ये परवाच्या दिवशी न्यायाधीशाकडून निर्णय जाहीर झाला आणि कृषिमंत्री कोकाटे यांना दोन वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली. न्यायव्यवस्थेत सुद्धा वरच्या कोर्टात जाता येते. सोमवारी वरिष्ठ न्यायालया मध्ये माणिकराव कोकाटे दाद मागतिल स्थगिती मिळाली, तर विषय आपोआप सुटेल. एक-दोन दिवस वाट पाहूया, माणिकराव कोकाटे यांना त्यावेळेस कोर्टाने जामीन सुद्धा मंजूर केला.

महाराष्ट्रात आणखी एक उदाहरण आहे ज्यांना शिक्षा झाली तुमच्या संदर्भातला निर्णय दोन वर्ष झाला नाही. उच्च न्यायालयातून त्यांनी स्थगिती घेतली असे आमदार आहेत.मी त्यांचं नाव घेऊ इच्छित नाही.

>>पान २

## कर्मयोगी संत गाडगे महाराज

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची १४९ वि जयंती, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

पान १ वरून...

### हिंदू धर्माचे रक्षण करणारे सगळे

सगळे सत्तेत आहेत.आज आई भराडीचा आशीर्वाद आहे. त्यामुळे आमच्या धर्माकडे वाईट नजरेने बघणाऱ्या सर्वांना आईने घरी नेऊन बसविले आहे. त्यामुळे मी आईचे आभार मानण्यासाठी आंगणेवाडीत आलो आहे. छत्रपती संभाजी राजे संगमेश्र्वर येथील स्मारकाबाबतची सर्व माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पोचविली आहे.आमचे माजी आमदार प्रमोद जठार हे याप्रकरणी सातत्याने प्रयत्नशील आहेत. अशी माहिती मंत्री नितेश राणे यांनी दिली.

### दहावीच्या पेपर फुटी प्रकरणात

पोलीस पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, पेपरफुटीवर राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटलंय की, काही ठिकाणी कॉपी झाली. कॉपी पुरविण्याचे प्रकार समोर आले, तशा चित्रफितही प्रसार माध्यमातून पुढे आल्या. त्याची निश्र्चितपणे गंभीर दखल शासन स्तरावर घेतली आहे. यापूर्वी ज्या केंद्रावर कॉपी झाली ते केंद्र रद्द करण्यात आले आहे. त्याच बरोबर यापूर्वी ज्या केंद्रावर कॉपी झाली आहे. त्या केंद्रावरील प्रशासन देखील बदलण्यात आले आहे. कॉपी पुरवणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. ते केंद्र दहावीच्या परिक्षेसाठी रद्द केले जाईल, असे दादा भुसे यांनी म्हटले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार

युवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना एक निवेदन दिल आहे. हा चित्रपट टॅक्स फ्री करावा सरकार या संदर्भातला सकारात्मक निर्णय लवकरच घेईल. राज्य सप्ताह आयोजन करण्याचे राष्ट्रवादीने ठरवले आहे. पूर्वनियोजित कार्यक्रमाला ते गेले असल्याने छगन भुजबळ कालच्या बैठकीला ते उपस्थित नव्हते. निधी वाटपा बाबत अशी चर्चा होणे योग्य नाही. नितेश राणेंचा वक्तव्य काय आहे. हे पाहावं लागेल. सिंधुदुर्गचे पालकमंत्री आहेत. त्या संदर्भात निधी संदर्भात वक्तव्य केले की, इतर काही बाबतीत बोलले ते त्यांच्याकडून मी समजून घेईल. निधी वाटपात पक्ष आणि सांगड घातली जाऊ नये असा अभिप्रेत असतं. नितेश राणेंची यासंदर्भात चर्चा करण्याचा योग येईल, जितेंद्र आव्हाड स्वीय सहाय्यक पक्ष प्रवेश केला. ते का आले ते का गेले त्यांनी का केले याची माहिती नक्की घेण्याचा प्रयत्न करेन. कर्नाटक मध्ये घडलेला प्रकार निंदनीय आहे.सरकारने अशा विकृत मनोवृत्तीच्या लोकांवर तात्काळ कारवाई केली पाहिजे. सहकारी निवडणुकीपूर्वी गेले असं काही नाही. अनेकांचा ओघ हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आहे आणि यातच नरेंद्र राणे आहेत. काही क्रिया प्रतिक्रिया भावना असू शकतात. त्या सगळ्यांच्या भावना मी समजून घेण्याचा प्रयत्न केला. नरेंद्र राणे यांनी वेगळी भूमिका घेतल्याचे पक्षाचे एकनिष्ठ राहिले त्यांच्या भावना समजून घेणे कर्तव्य राहिल.त्यांचं मत आहे की, मी पक्षाच्या प्रवाहात सहभागी झालेलो आहे. अशी माहिती खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

### अमली पदार्थाच्या शेतीवर

खामगाव अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, बुलढाणा अपर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी, देऊळगाव राजा उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती मनीषा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांचे आदेशाने एपीआय आशिष रोही, सपोनि रुपेश शक्करगे, पीएसआय सचिन कानडे, पीएसआय प्रताप बाजड, एएसआय राजकुमार राजपूत, पोहेका. दीपक लेकुरवाले, पोहेका वनिता शिंगणे, पोलीस कॉन्स्टेबल शेख चांद, पुरुषोत्तम आघाव, राजेंद्र टेकाळे, दिनेश बकाले, गणेश पाटील, सतीश हाताळकर, अनुपकुमार मेहेर, विजय वारुळे, युवराज राठोड, गजानन दराडे, विजय पैठणे, मंगेश सनगाळे, दीपक वायाळ, भारत जाधव, शिवानंद मुंढे, समाधान टेकाळे, सुरेश भिसे, विलास भोसले यांच्या पथकाने केली.

# देऊळगाव माळीच्या मातीत वाघ्या मुरळीच्या घुंगराचा नाद; राज्यस्तरीय वाघ्या मुरळी स्पर्धा उत्साहात संपन्न

## देऊळगाव माळी गावाने जपला लोककलेचा वारसा
## तब्बल आठ तास वाघ्या मुरळीचे नृत्य
## विजेते; शिव मल्हार वाघे मंडळ, धोत्रा नंदाई ज्यांनी पटकावला प्रथम क्रमांक

दैनिक आपला विदर्भ




**देऊळगाव माळी/प्रतिनिधी :** बदलत्या काळाच्या ओघात अनेक अस्सल लोककला लूप्त होण्याच्या मार्गावर आहेत. मात्र पोटाची खळगी भरण्यासाठी काही कलावंतांनी प्राचीन काळापासून चालत आलेल्या प्राचीन कला आजही जीवंत ठेवल्या आहेत. जागरण, गोंधळ घालणाऱ्या वाघ्या-मुरळीचा आवाज ग्रामीण भागात आजही गुंजत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

तोच घुंगरांचा नाद मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी येथे वाघ्या मुरळीची राज्यस्तरीय भव्य स्पर्धेत गुंजला. यामध्ये परभणी, औरंगाबाद, बुलढाणा, जालना, नाशिक,जळगावासह इतर जिल्ह्यातील वाघ्या मुरळी पार्टीने सहभाग नोंदविला होता.

या वाघ्या मुरळीच्या जागरण गोंधळ स्पर्धेच्या कार्यक्रमांमधून स्त्री भ्रूणहत्या, लेक वाचवा, लेक शिकवा, व्यसनाधीनता, ग्रामस्वच्छता, स्वच्छ भारत मिशन, हुंडाबंदी, दारूबंदी, बालविवाह नको, एकत्र कुटुंब पद्धती, आई-वडिलांचा सांभाळ करा, वृद्धाश्रम नको, अशा अनेक समाजप्रबोधनाच्या गीताच्या माध्यमातून समाज जागृती करत ही भव्य दिव्य स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत शिव मल्हार वाघ्या मंडळ धोत्रा नंदाई या मंडळाने प्रथम क्रमांक पटकावला.

वाघ्या-मुरळी यांना खंडोबाचे उपासक म्हणून ओळखले जाते. अपत्यप्राप्तीसाठी किंवा मूल जन्माला येऊनही जगत नसेल, तर खंडोबाला नवस करणारे मातापिता 'मला मूल होऊ दे, ते जगल्यास मी तुला अर्पण करीन', असा नवस करायचे. नवसानंतर जन्मास आलेले मूल खंडोबाला अर्पण केले जायचे. मुलगा असल्यास त्याने वाघ्या; तर मुलगी असल्यास तीने मुरळी म्हणून संपूर्ण जीवन जगायचे, असा वाघ्या-मुरळीचा इतिहास असल्याची माहिती जाणकार देतात.

महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात खंडोबाची एकूण ११ ठाणी असून तेथे लग्न, मुंजीनंतर वाघ्या-मुरळींकडून जागरण घातले जाते अशी महाराष्ट्रात संस्कृती आहे.

वाघ्या-मुरळी यांना खंडोबाचे उपासक म्हणून ओळखले जाते. त्या खंडोबारायाच्या जागर करण्यासाठी मागील तीन वर्षापासून दे.माळी येथे भव्य राज्यस्तरीय वाघ्या मुरळी स्पर्धा आयोजित केली जाते. १८ फेब्रुवारी रोजी तब्बल आठ तास चाललेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायण ए. बळी उपजिल्हाप्रमुख किसान आघाडी,हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रकाशभाऊ डोंगरे उपजिल्हाप्रमुख युवा सेना, उपसरपंच रंगनाथ चाळगे, राज वडतकर, योगेश कंकाळ, पत्रकार समाधान चिंचोले, तुकाराम मगर, (पंच - जगन्नाथ चांगाडे, डॉ. बद्री मगर, माधव सखाराम मगर, दत्ता घुगे दुसरबिड) पो. पा.गजानन चाळगे, संपादक कैलास राऊत,दुर्गादास काटे महाराज, बळीनाथ गिरी महाराज, रवींद्र गुरव महाराज खामगाव, सुखदेव वानरे, पत्रकार रवींद्र सुरूशे ,यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक काटे महाराज यांनी केले . रात्री आठ ते पहाटे चार पर्यंत सातत्याने आठ तास चाललेल्या या स्पर्धेचे उत्कृष्ट सूत्रसंचालन व आभार दै. बातमीजगचे मुख्य संपादक कैलास राऊत यांनी केले.

### हे ठरले विजेते

प्रथम ;शिव मल्हार वाघे मंडळ धोत्रा नंदई, द्वितीय ;जय मल्हार वाघे मंडळ बोरगाव काकडे, तृतीय; शिव मल्हार वाघे मंडळ किनगाव राजा, चतुर्थ; गुरुकृपा जागरण गोंधळ पार्टी केशव शिवनी, पाचवा क्रमांक; जय मल्हार वाघे मंडळ मलकापूर पांगरा, तर सहावी बक्षीस जय मल्हार वाघे मंडळ अंजनी खुर्द यांनी पटकावले. याचं अनेक जिल्ह्यातून स्पर्धक या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. विजेत्यांना मोठ्या रकमेचे बक्षीस देण्यात आले.

### यांनी जपली सांस्कृतिक परंपरा..

मागील तीन वर्षापासून नारायण बळी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन सुरेश जाधव, बद्री चाळगे ,विशाल चाळगे, गणेश तायडे, श्रीकृष्ण ढवळे, कैलास चाळगे, शंकर चाळगे, शिवाजी चाळगे ,भीमराव गायकवाड, अशोक वाघमारे ,हे सातत्याने तीन वर्षापासून कार्यक्रमाचे आयोजन करून ही लोककला जपत आहे.

### यांचे दातृत्वासाठी एक पाऊल पुढे.

स्पर्धकांचा उत्साह वाढवण्यासाठी प्रकाशभाऊ डोंगरे उपजिल्हाप्रमुख, मा. जि .प .सदस्य संजय वाडकर, योगेश कंकाळ, रवींद्र पुरी मुंबई, गणेश एस.बळी, संदीप पी.भराड, सतीश ताजणे, ओम कृषी केंद्र भागवत मगर, कन्हैया कुंडलिक राऊत, जगन्नाथ रंगनाथ मदने, पहिलवान ऋषिकेश चाळगे यांच्यासह अनेकांचे दातृत्वाच्या भूमिकेतून हात स्पर्धेसाठी पुढे असतात.

## मी तुला खूप मिस करतेय...' युजवेंद्रसोबत घटस्फोट अन् धनश्री झाली भावूक, खास व्यक्तीसाठी लिहिली पोस्ट

मुंबई : क्रिकेटर युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा गेल्या १८ महिन्यांपासून एकत्र राहत नव्हते. लग्नाच्या ४ वर्षांनंतर दोघांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला आहे. या जोडप्याने न्यायालयात घटस्फोटाचा अर्ज दाखल केला आहे. दोघांच्या घटस्फोटामुळे चाहत्यांना मोठा धक्काच बसला. गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्या घटस्फोटाच्या अफवांनी जोर धरला होता. अखेर या चर्चा खऱ्या ठरल्या आणि धनश्री-युजवेंद्रने आपले रस्ते वेगवेगळे केले. घटस्फोटामुळे दोघेही चर्चेत असून यामध्येच धनश्रीने एक भावूक पोस्ट शेअर केलीय जी सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे.

युजवेंद्रसोबत घटस्फोट आणि दुसरीकडे धनश्री वर्माने एक भावूक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये तिने खूप मिस करत असल्याचे सांगितले आहे. पण नेमके कोणाला? ही पोस्ट सोशल मीडियावर सर्वांच्या भुवया उंचावत आहे. ती तिच्या कठीण काळात तिच्या आयुष्यातील खास व्यक्तीची आठवण काढत आहे.


धनश्रीने इंस्टाग्राम स्टोरीवर एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये तिने खास व्यक्तीला मिस करत असल्याचे म्हटले आहे. धनश्रीने ही पोस्ट शेअर करत लिहिले, 'एक वर्ष झाले. नानी, मला तुझी खूप आठवण येते. सर्व आव्हानांमध्ये माझे रक्षण केल्याबद्दल आणि सन्मानाने माझे जीवन जगण्याचे धैर्य दिल्याबद्दल धन्यवाद. आज तुमच्या शिकवणीने मला खूप मदत केली. आय लव्ह यू.' धनश्रीने नानीसाठी केलेली ही पोस्ट सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे.

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून धनश्री वर्मा आणि युजवेंद्र चहल यांच्या घटस्फोटाच्या अफवा चर्चेत होत्या. धनश्रीने युजवेंद्रकडून पोटगी म्हणून ६० कोटी रुपये मागितल्याच्या अफवा पसरल्या होत्या. ही बातमी खोटी असल्याचे सिद्ध झाले. धनश्रीच्या कुटुंबाने अफवांवर नाराजी व्यक्त केली आणि ती नाकारली. धनश्रीच्या वकिलाने त्यांच्या शेवटच्या जबाबात स्पष्टपणे सांगितले की त्यांचा अद्याप घटस्फोट झालेला नाही, प्रकरण न्यायालयात आहे.

युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्माने २२ डिसेंबर २०२० रोजी विवाह केला होता. लॉकडाऊनच्या काळात, चहलने धनश्रीच्या डान्स क्लासमध्ये सहभागी होऊन त्यांच्या नात्याची सुरुवात केली होती. मात्र काहीच वर्षात दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला आणि आता दोघांचा घटस्फोट होत आहे.

# राहुड घाटात सहा ते सात वाहनांच्या विचित्र अपघातात महिला ठार, तर १७ जण जखमी

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** तालुक्यातील राहुड घाटात शुक्रवारी (दि. २१) रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास सात ते आठ वाहनांमध्ये झालेल्या विचित्र भीषण अपघातात एक महिला ठार तर १७ जण जखमी झाले आहेत. त्यातील पाच गंभीर जखमींना नाशिक येथे हलविण्यात आले आहे. अपघातानंतर राहुड घाटात वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

चांदवड तालुक्यातील राहुड घाटात मुंबई-आग्रा महामार्गावर शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास कंटेनर, दोन ट्रक, दोन ते तीन कार अशा एकूण सहा ते सात वाहने एकमेकांवर आदळून अपघात झाला. या अपघातात उषा मोहन देवरे (४५, रा. भारतीनगर, मालेगाव) या महिलेचा मृत्यू झाला. तर अभिमान त्रंबक देवरे (४३, भारतीनगर, मालेगाव), मीराबाई महादू पवार (५०, मालेगाव) सार्थक योगेश पाटील (७, मालेगाव), शितल सुरज चव्हाण (१५, मालेगाव), रोशनी बापू महाले (६५, सटाणा), ज्योत्स्ना तेजस महाले (३०, रा. श्रीकुरवाडे, सटाणा), बापू मानसिंग महाले (७०, सटाणा), जिजाबाई भिला देवरे (७०, मालेगाव) हे गंभीर जखमी झाले. तर तेजस बापू महाले (३८, सटाणा), तनवीर आणि शेख (३२, मुंबई), अफ्रिन तनवीर शेख (३२, मुंबई), सोनाली योगेश पाटील (३५, मालेगाव), बळीराम त्र्यंबक देवरे (५०, मालेगाव), याना तन्वीर शेख (७, मुंबई), रोमेहा तनवीर शेख (५, मुंबई), आरवा तनवीर शेख (दीड महिना), रेणुका योगेश पाटील (दीड वर्ष, मालेगाव) हे जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच चांदवड टोल नाक्यावरील अपघात विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मदत कार्य केले. जखमींना तातडीने रुग्णवाहिकेतून चांदवड उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करून गंभीर जखमींना नाशिक येथे पाठविण्यात आले आहेत. अपघातानंतर चांदवड उपजिल्हा रुग्णालयात नातलगांची एकच गर्दी झाली होतीहोती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707


हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मुंबई मंत्रालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न.. मुंबई पोलिसांच्या सतर्कतेमुळे युवकाचे वाचले प्राण..

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/का. प्रतिनिधी :** जिल्ह्यातील बहुचर्चित बनावट नोटा प्रकरणी यशवंत सेनेचे जिल्हा संघटक गजानन बोरकर यांनी मुंबई येथे मंत्रालयासमोर अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला प्रसंगी मुंबई पोलीस वेळीच धावल्यामुळे मोठा अनर्थळून गजानन बोरकर यांचा जीव वाचवण्यात मुंबई पोलिसांनी मोलाचे योगदान दिले आहे.

आपल्या कर्तव्यप्रती इमान बाळगून पोलिसांनी कारवाई केल्यास कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीस टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ येत नाही. मेहकर पोलीस स्टेशन अंतर्गत घडलेला बनावट नोटा प्रकरणाचा नाट्यमय घडामोडीचा पडदा अजून उठत नाही. मागील दोन महिन्यांपासून पोलीस दरबारी तक्रारी करून जेरीस



आलेल्या गजानन बोरकर यांनी २० फेब्रुवारी रोजी दुपारच्या दरम्यान मुंबई मंत्रालया समक्ष अंगावर डिझेल ओतून स्वतःला पेटवण्याचा प्रयत्न केला परंतु घटनास्थळावर उपस्थित असलेल्या पोलिसांकडून त्यांच्या हातामधली माचिस हिसकावल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे त्याचप्रमाणे त्यांचा जीव वाचवण्यात मुंबई पोलिसांना यश आले आहे. पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार उपविभागीय अधिकारी प्रदीप पाटील यांनी केलेल्या चौकशीमध्ये आणि ठाणेदार घुगे यांनी केलेल्या कारवाईच्या तपास दरम्यान मोठी तफावत आढळून आली आहे. याप्रकरणी ठाणेदार घुगे यांच्यावर जिल्हा पोलीस अधीक्षक विश्र्वा पानसरे यांनी आठवडा उलटून सुद्धा कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. या संदर्भात आंदोलनकर्त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना स्मरणपत्र सुद्धा दिले होते. भ्रमणध्वनी वरून जिल्हा पोलीस अधीक्षकांसोबत बोरकर यांची चर्चा सुद्धा झाली होती. चुकीला क्षमा नाही अशा प्रकारचे अभिवचन जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी बोरकर यांना दिले होते. आंदोलन कर्त्याच्या सांगण्यानुसार जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या दिलेल्या शब्दावरून त्यांनी आपले आंदोलन तात्पुरते स्थगित केले होते. परंतु वरिष्ठ अधिकारी सुद्धा कोणत्याही प्रकारची कारवाई करत नाही असे दिसून आल्याने झालेला गैरप्रकार उघडकीस आणण्यासाठी बोरकर यांच्याकडे कोणताही मार्ग उरला नव्हता त्यामुळे त्यांनी टोकाचे पाऊल घेत मंत्रालया समक्ष अंगावर डिझेल ओतून स्वतःला पेटवण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य व्यक्तीच्या कायदा सुव्यवस्था संदर्भात उभारलेल्या या लढ्याला पोलीस विभागाकडूनच पाठ फिरवली जाते. अर्थातच पोलीस अधिकारी यामध्ये संशयाच्या भूमिकेत असल्यामुळे आपल्या अधिकाऱ्याला वाचविण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. परंतु बनावट नोटा प्रकरण अथवा नोटांचा पाऊस रॅकेट या संदर्भात गंभीर घटना गुन्हे दाखल आहेत. अशा प्रकारच्या आरोपीत व्यक्तींना वाचण्यासाठी पोलीस दल आपली सर्व शक्ती खर्च करीत आहे ही बाब चिंताजनक आहे.

मुंबई येथे मंत्रालया समक्ष जीवावर उधार होऊन केलेल्या आंदोलनाला यश मिळणार अथवा अद्यापही जिल्हा पोलीस अधीक्षक याकडे पाठ फिरून बसणार या संदर्भात आगामी काळात निश्र्चित कळेल. परंतु नाईक लढाई लढत असताना आपला जीव दावणीवर ठेवत आंदोलन केल्यामुळे गजानन बोरकर यांना नरिमन पॉईंट पोलीस चौकीमध्ये चौकशी करण्यासाठी नेण्यात आले होते. वृत्त लिखेपर्यंत त्यांची सुटका झाली नसून कोणत्या प्रकारचा गुन्हा दाखल झाला हे सुद्धा कळले नव्हते.

## संक्षिप्त...

### उद्योग मंत्री उदय सामंत यांनी घेतले भराडी देवीचे दर्शन

**दैनिक आपला विदर्भ**



**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** आजचा दिवस हा विलक्षण योगायोग आहे. निलेश राणे हे आमदार झाल्यानंतर मी त्यांच्यासोबत आंगणेवाडी भराडी देवी दर्शनासाठी आलो आहे. मी देवी समोर प्रार्थना केली की, भविष्यात कोणावर संकट येऊ नयेत. तसेच आंगणे कुटुंबीयांनी ज्या विकासात्मक मागण्या ज्या केल्या आहेत त्याचा शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. आंगणे कुटुंबियांना अभिप्रेत असलेला विकास येथे करण्यात येईल. असे मत उद्योग मंत्री उदय सामंत यांनी भरडा देवीचे दर्शन घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी बोलताना उदय सावंत म्हणाले की राज ठाकरे भेटीबाबत तर्क-वितर्क अजिबात लावू नयेत, विश्र्व मराठी संमेलनावेळी माझ्या एका कॉलवर राज ठाकरे उपस्थित राहिले होते. मात्र, त्यानंतर आभार मानण्यासाठी त्यांची आणि माझी भेट होऊ शकली नव्हती. त्यांनी मला आज सकाळी ८ वाजता भेटण्याची वेळ दिली होती.या भेटीत आम्ही गप्पा मारल्या. पण कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही. मराठी साहित्य संमेलनाला मोदी-पवार भेट आहे. ही भारतीय राजकारणातील संस्कृती आहे. ज्येष्ठ सहकारी म्हणून शरद पवार यांना नरेंद्र मोदींनी खुर्ची दिली. त्याचा आदर्श महाराष्ट्रातील काही राजकारण्यांनी घ्यावा. आजु-बाजुला बसले म्हणजे ताबडतोब जवळीक झाली असे नाही. असे मत उद्योग मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केले.

### कारमधून गुटख्याची वाहतूक, गुटख्यासह ७ लाखांचा मुद्देमाल जप्त




**दैनिक आपला विदर्भ**

**जालना/प्रतिनिधी :** अंबड-जालना रोडवर एक कार वेगाने जात असताना पोलिसांनी या कारचा पाठलाग करून चालकाला गाडी थांबवण्यास सांगितलं. यावेळी चालकाने उडवा उडवीची उत्तर दिली याच दरम्यान पोलीसांनी चालकाकडे कारमधून कशाची वाहतूक होत आहे याबाबत माहिती विचारली असता त्याने सांगण्यास टाळाटाळ केली.यावेळी पोलिसांनी कारची झाडाझडती घेतली असता कारमधून गुटख्याची वाहतूक होत असल्याचं निदर्शनास आलं. दरम्यान पोलिसांनी कार चालकाला ताब्यात घेतलं असून कारमधील गुटखा जप्त केला आहे जप्त केलेल्या गुटख्याची किंमत दिड लाख रुपये असुन कार देखील पोलिसांनी ताब्यात घेतली आहे पोलीस याप्रकरणी अधिक चौकशी करत आहेत.

### दिव्यातील बेकायदा इमारतींवर कार्यवाईचे आदेश, नागरिकांचा कारवाईला विरोध




**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे महानगरपालिका हद्दीत दिवा शहरात काही अनधिकृत इमारतींवर हायकोर्टाने कार्यवाईचे आदेश महापालिकेला दिले होते. ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी कारवाईसाठी इमारतीच्या परिसरात पोहोचले. इमारतीतील रहिवाशी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. रहिवासी रस्त्यावर उतरलेले पाहायला मिळत आहेत. रहिवाशांनी प्रतिकात्मक फाशी फलक रस्त्यावर लावले आहेत. प्रशासनाच्या या कारवाईचा नागरिकांनी विरोध केला आहे. आम्हाला बेघर करताय तर आम्हाला फाशी द्या, या स्वरूपाचे आंदोलन स्थानिक नागरिकांनी केलं. महापालिकेच्या या कारवाईला शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकारी यांनी विरोध करत निषेध नोंदवला आहे.

## महाजन आणि पाटील यांनी प्रचंड बळ गँगला दिले; आमदार सुरेश धस यांचा आरोप

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी :** केजचे तत्कालीन पोलीस निरीक्षक महाजन आणि पाटील तपास केल्यानंतर सह आरोपी होतील. त्यांना सह आरोपी करा ही मागणी आहे. महाजन आणि पाटील यांनी प्रचंड बळ गँगला दिले आहे. असा आरोप आमदार सुरेश धस यांनी माध्यमांशी बोलताना केला.



आमदार सुरेश धस बीड जिल्हा दौऱ्यावर आले असता, माध्यमांशी बोलताना म्हणाले की, कृष्णा आंधळे यांच्यावर ३०७ चा गुन्हा दाखल असताना पोलीस अधिकारी नित्यनियमाने भेटत होते.३०७ च्या फरार आरोपीसोबत पोलीस गप्पा मारत होते कृष्ण आंधळे आजही सापडायला तयार नाही.

पोलीस अधिकारी महाजन यांना सस्पेंड करा आणि या दोघांना सह आरोपी करा. आरोपी न्यायालयात आणले आसता त्यांची बडदास्त राखली जाते. पोलीस अधीक्षक यांच्यासोबत चर्चा झाली आहे. - विविध विषयांवर चर्चा केली यात राजस्थानी मल्टीस्टेट बाबत चर्चा झाली. अशोक मोहिते या तरुणावर हल्ला झाला होता. त्याबाबत पोलीस अधिकाऱ्यांसोबत चर्चा झाली. त्यातील आरोपी सुटला नाही पाहिजे अशी विनंती केली आहे. ग्रामस्थांच्या मागण्यासंदर्भात चर्चा झाली आहे. अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी दिली.

## एकनाथ शिंदेंना धमकी देण्याच्या प्रकरणाला नवे वळण, हाती आली धक्कादायक माहिती

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ई-मेलद्वारे धमकी देण्यात आली होती. एकनाथ शिंदेंच शासकीय वाहन बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली होती. या प्रकरणी मुंबई आणि अकोला एटीएस तसेच मुंबई गुन्हे शाखा कक्ष १२ च्या पोलिस पथकाने कारवाई केली. बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील देऊळगाव मही येथून ई-मेल पाठविणाऱ्या अभय शिंगणे (२५) आणि त्याचा नातलग मंगेश वायाळ या दोघांना अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर त्यांची कसून चौकशी करण्यात आली. शुक्रवारी एटीएसच्या पथकाने दोघांना अटक करून मुंबईला नेले. या प्रकरणी गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभय शिंगणेच्या दुकानात मंगेश वायाळ याने मोबाइल चार्जिंगला लावला होता. याच मोबाईलमध्ये असलेल्या मंगेशच्या ई - मेल आयडीवरुन धमकीचा मेल पाठवण्यात आला. विशेष म्हणजे मंगेशच्या ई - मेल आयडीवरुन पाठवण्यात आलेला हा पहिला ई - मेल आहे. आपण मेल पाठवलेला नाही, असे मंगशचे म्हणणे आहे.

अभयचे एका तरुणीवर प्रेम होते. या तरुणीचा मृत्यू झाला. या मृत्यूला अभय जबाबदार असल्याचा आरोप मंगेश करत होता. याच मुद्यावरुन मंगेशने अभयला शिवीगाळ आणि मारहाण केली होती. याचा बदला घेण्यासाठी अभयने मंगेशच्या ई - मेल आयडीवरुन धमकीचा मेल पाठवल्याची प्राथमिक माहिती हाती आली आहे. आतेभाऊ-मामेभाऊ असे आरोपींचे नाते आहे. मंगेश वायाळ अल्पशिक्षित असून, अभयचे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे; अशीही माहिती हाती आली आहे. पण या प्रकरणात सखोल चौकशी करुन मास्टरमाईंड शोधावा, अशी मागणी माजी आमदार शशिकांत खेडेकर यांनी केली आहे.

## सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी भव्य रोजगार मेळावा, श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते आयोजित



**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने भोकर विधानसभेच्या भाजपाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांच्या वतीने भव्य रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं.

नांदेडच्या अर्धापूर येथे आंयोजित करण्यात आलेल्या मेळाव्याचे उद्घाटन राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. या रोजगार मेळाव्यात जवळपास ४००० युवकांनी नोंदणी केली आहे. दीडशेहून अधिक कंपन्यांचे प्रतिनिधी या मेळाव्यात सहभागी झाले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून युवकांच्या कागदपत्रांसह जागेवर त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत .अनेक युवकांना याच ठिकाणी कंपन्यांनी मुलाखती घेऊन थेट नोकरीची संधी दिली आहे त्यामुळे अशा युवकांच्या चेहऱ्यावर आनंद देखील पहावयास मिळाला आहे .नांदेड जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांना या मेळाव्याच्या माध्यमातून नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्याने मला देखील खूप आनंद झाल्याची प्रतिक्रिया भाजपाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी दिली.

## वीस वर्षापूर्वीच्या मारहाणी प्रकरणात; चांगल्या वर्तनामुळे अभिनेता आदित्य पांचोली याला शिक्षा माफ

**मुंबई/प्रतिनिधी :** वीस वर्षापूर्वी म्हणजेच २००५ मध्ये गाडी उभी करण्याच्या वादातून एकाला मारहाण केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या अभिनेता आदित्य पांचोली याला सत्र न्यायालयाने दिलासा दिला आहे. या प्रकरणी त्याला दोषी ठरवण्याचा आणि एक वर्षाची शिक्षा सुनावण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय न्यायालयाने योग्य ठरवला, मात्र चांगल्या वर्तनामुळे न्यायालयाने त्याची शिक्षा माफ केली. त्याचवेळी, तक्रारदाराला दीड लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने पांचोली याला दिले. साधारणत: २० वर्षापूर्वी ही घटना घडली असून आरोपी ७१ वर्षाचा आहे, शिवाय तो एक प्रसिद्ध अभिनेता आहे. त्याची कोणतीही गुन्हेगारी पार्श्र्वभूमी नाही आणि गाडी उभी करण्यावरून झालेल्या वादातून अचानक त्याच्या हातून हे कृत्य घडले. कनिष्ठ न्यायालयाने प्रकरणाचा निकाल देताना या पैलूंचा पुरेसा विचार केलेला नाही. आरोपीने क्रूर पद्धतीने कृत्य केलेले नाही. म्हणूनच त्याला सुनावण्यात आलेल्या शिक्षेत बदल करावा, असे सांगत न्यायालयाने पांचोली याला चांगल्या वर्तनासाठी शिक्षेत माफी दिली.

# मातीच्या भांड्यावर २५ टक्क्यांनी वाढ, कच्च्या मालाचे भाव वाढल्याने माठ आणि रांजण महागले

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** उन्हाळ्याचे चाहूल लागताच सर्वांचे पावले हे गरिबाचं फ्रिज म्हणून ओळख असलेल्या मातीचे भांडे अर्थात रांजण खरेदी करण्याकडे वळतात. गोरगरिबांना मोठे फ्रिज खरेदी करणे शक्य नसल्याने शंभर -दोनशे रुपयांचे गरीबाचे फ्रीज म्हणून ओळखले जात असलेल्या राजनाला खरेदी करण्याला प्राधान्य देत गरीब वर्ग हे उन्हाळ्यात आपल्या थंड पाण्याची गरज माठातद्वारे भागवितात. मात्र, कच्च्या मालाचे भाव वाढल्याने माठाचे भावही चांगलेच वधारले आहेत. त्यामुळे गरीबाचा फ्रिज महाग झाल्याचे चित्र बाजारात दिसून येत आहे. उन्हाळ्याच्या काळामध्ये मातीचे भांडे बनवण्याचा व्यवसाय करणाऱ्या



### मातीच्या भांड्याची मागणी कमी झाली

उन्हाळ्याची चाहूल लागल्याने मातीची भांडी बाजारात दाखल झाली आहेत.गरीबाचा फ्रीज समजल्या जाणाऱ्या मातीचे माठ आणि रांजण यांची किंमत यावर्षी जवळपास २५ टक्क्यांनी वाढली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा सामना करावा लागतोय. दरवर्षीच बुलढाण्यात मातीच्या रांजण, माठ, घागरी याची मोठी मागणी पाहायला मिळत असते. मात्र, यावर्षी कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने या भांड्यांमध्ये देखील २५ टक्क्याने भाव वाढ झाली आहे. यामुळे मातीच्या भांड्यांची मागणी थोडी कमी झाल्याचे चित्र बाजारपेठेत पाहायला मिळत आहे.

**-बेबीताई तुकाराम खानझोडे, माठ विक्रेते**

विशिष्ट वर्गाचा उदरनिर्वाह मातीचे भांडे अर्थात माठ, रांजण, घागर यासह लग्नातील मानाचे मातीचे भांडे बनवून तो विक्री करण्याचा मुख्य व्यवसाय आहे. या व्यवसायातून हा वर्ग आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.कमी किमतीत हे भांडे मिळत असल्याने गोरगरीब व सर्वसामान्य व्यक्ती हे मातीचे भांडे खरेदी करण्याला प्राधान्य देतात. मातीच्या भांड्यातील पाणी हे शरीरासाठी अत्यंत पोषक असल्याने गोरगरिबांसह गत काही वर्षांपासून श्रीमंत वर्गही मातीच्या भांड्यातील पाणी पिण्याला प्राधान्य देत असल्याने मातेच्या भांड्याची मागणी वाढली आहे. मात्र, कच्च्या मालाच्या किंमती वाढल्याने गोरगरिबांचा फ्रिज अर्थात रांजण, माठ यांचे भावही वाढल्याने बाजारात गरिबी गरिबांचा फ्रिज महागला असल्याच्या चर्चा होत आहे. भावात वाढ झाल्याने मात्र, ग्राहकांचा हिरमोड होत असल्याचे चित्र बाजारात दिसून येत आहे.

# केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांच्या आयुष मंत्रालयाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद!

## रिचर्ड विल्यम्स स्टेनिंग यांनी केली आयुष मंत्रालयाच्या पाच जागतिक विक्रमांची घोषणा!!

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या देश का प्रकृती परीक्षण या अभियानात १ कोटी २९ लाखांहुन अधिक नागरीकांचे प्रकृती परीक्षण यशस्वीरीत्या पुर्ण केल्याबद्दल गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली असुन याशिवाय ५ जागतिक विक्रमांची नोंद झाल्याची अधिकृत घोषणा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे रिचर्ड विल्यम्स स्टेनिंग यांनी नुकतीच मुंबई येथे केली आहे.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना ५ ही विश्र्व विक्रमांची प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली आहे. ही भारतीय आयुर्वेदासाठी गौरवाची बाब आहे. बुलढाणा लोकसभा मतदार संघातुन सलग चौथ्यांदा निवडुण आलेले खासदार प्रतापराव जाधव यांचे नांव केंद्रीय मंत्रीपदासाठी शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथराव शिंदे यांनी पुढे केले.







९ जून २०२४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्री मंडळामध्ये प्रतापराव जाधव यांनी पहील्यांदाच मंत्रीपदाची शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये नव्यानेच निर्माण केलेल्या आयुष मंत्रालयाची जबाबदारी प्रतापराव जाधव यांच्याकडे सोपविण्यात आली. गेल्या नऊ महीन्याच्या कालावधीमध्ये आयुष मंत्रालयाच्या वतीने विविध समाज उपयोगी कामे करण्यात येत आहे. शासकिय रुग्णालयामध्ये अमृत औषधालय यासह आयुर्वेद, युनानी, योगा संदर्भात भरीव काम देशपातळीवर केल्या जात आहे.

गेल्या वर्षी २६ नोव्हेंबर २०२४ ते २५ डिसेंबर २०२४ माजी पंतप्रधान तथा भाजपाचे जेष्ठ नेते स्व.अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंती निमीत्त संपुर्ण देशामध्ये देश का प्रकृती अभियान राबविण्यात आले. या एका महीन्याच्या कालावधीमध्ये देशातील १ कोटी नागरीकांचे प्रकृती परीक्षण करण्याचे लक्ष निर्धारीत करण्यात आले होते. निर्धारीत लक्षाच्या पुढे जाऊन १ कोटी २९ लाखापेक्षा जास्त नागरीकांचे प्रकृती परीक्षण यशस्वीरीत्या पुर्ण करण्यात आले. हा आयुष मंत्रालयाचा एक जागतिक विक्रम झाला आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे डज्युडीकेटर रिचर्ड विल्यम्स स्टेनिंग यांनी मुंबई येथे झालेल्या एका कार्यक्रमात या नोंदीची अधिकृत घोषणा केली आहे.

शिवाय ५ जागतिक विक्रमही या अभियानातंर्गत प्रस्थापीत झाल्याचे त्यांनी घोषीत करुन या पाचही विश्र्वविक्रमांची प्रमाणपत्रे केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांना प्रदान केली. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आयुष मंत्रालयाचे सचिव पद्मश्री राजेश कोटेचा, भारतीय चिकीत्सा पध्दती राष्ट्रीय आयोगाचे अध्यक्ष वैद्य जयंत देवपुजारी, देशाचे प्रकृती परीक्षण अभियान समितीचे सचिव डॉ.आशुतोष गुप्ता, पद्मश्री-पद्मविभूषण वैद्य देवेंद्र त्रिगुणा, वैद्य प्रा.राकेश शर्मा, डॉ.बी.एस.प्रसाद, डॉ.रघुराम भट्ट, डॉ.जगन्नाथ आणि श्री.सच्चिदानंद प्रसाद उपस्थित होते. देशका प्रकृती परीक्षण अभियान पुर्ण करण्यासाठी भारतातील १३३७५८ विदयार्थ्यांनी, १६१५५ अध्यापकांनी, ३१७५४ चिकीत्सकांनी, असे एकूण १८१६६७ स्वयंसहायकांच्या योगदान मिळाले.

## विविध वृत्त...

### दुबईतील अबुधाबी येथे २३ फ्रेबुवारीला साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती उत्सवात केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव होणार सहभागी




**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती देशभरासह विदेशातही साजरी होत आहे आखाती देश अबुधाबी येथे २३ फेब्रुवारीला साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती सोहळ्यात केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव ही सहभागी होणार आहेत

आखाती देशांमध्ये स्थायिक झालेल्या नवीन मराठी पिढीला इतिहासाची ओळख व्हावी या दृष्टिकोनातून दुबईतील अबुधाबी येथे इन्स्पायर इव्हेंट अँड प्रमोशन व भारतीय स्थानिक रहिवाशी यांच्या संयुक्त विद्यमाने २३ फेब्रुवारीला बी ए पी एस हिंदू मंदिर अबूधाबी दुबई येथे शिवजयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहें या कार्यक्रमांच निमंत्रण केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांना देण्यात आला आहे या निमंत्रणाचा स्वीकार करून अबूधाबी येथे होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सवाच्या कार्यक्रमात केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव सहभागी होणार असून तेथील मराठी माणसांसोबत ही संवाद साधणार आहेत ...

### भिवंडीत पालिका शौचालय दोन वर्षांपासून बंद, त्रस्त नागरिकांकडून पालिकेत आंदोलन करण्याचा इशारा

**दैनिक आपला विदर्भ**



**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी शहरातील कामतघर परिसरातील विनायक नगर येथे दोन वर्षांपासून ३० लाख रुपये खर्च करून सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले. परंतु, आज पर्यंत शौचालयाचा वापर सुरू न केल्याने आजही शौचालय कुलूप बंद अवस्थेत पडून आहे. त्यामुळे नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. या बंद शौचालय परिसराला दारुडे, गर्दुल्यांनी आपला अड्डा बनवला आहे अशी तक्रार नागरिक करीत आहेत. याबाबत स्थानिकांनी माजी नगरसेवक कमलाकर पाटील यांच्याकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी परिसराची पाहणी करीत मंगळवार पर्यंत शौचालय सुरू न केल्यास पालिका मुख्यालयात शौचालयाचे डब्बे घेऊन नागरिक आंदोलन करतील असा इशारा दिला आहे.

### महाराष्ट्र-कर्नाटक वाद सुरूच राहणार, मात्र महाराष्ट्रात कधीही कर्नाटकच्या चालक-वाहकांना आजवर मारहाण झालेली नाही -विजय देवणे

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कर्नाटक मध्ये मारहाण झालेल्या महाराष्ट्रीयन एसटी चालक-वाहकांचा कोल्हापुरात शिवसेना ठाकरे पक्षाकडून सत्कार करण्यात आला आहे. कन्नड संघटनेच्या गुंडांच्या दहशतीला सामोरे जात प्रवाशांना सुरक्षित ठेवल्याने आणि कोल्हापुरात सुरक्षीत पोहचवल्याने शिवसेना ठाकरे पक्षाकडून चालक-वाहकांना फेटा बांधून व हार घालून हा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र-कर्नाटक वाद सुरूच राहणार, मात्र महाराष्ट्रात कधीही कर्नाटकच्या चालक-वाहकांना आजवर मारहाण झालेली नाही. मात्र अशा प्रकारच्या घटना घडत असतील तर दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे असल्याचे शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सांगितलंय.



# प्रेम प्रकरणातून तरुणाची निर्घृण हत्या

## शिरपूर तालुक्यातील काळा पाणी गावातील धक्कादायक घटना

**दैनिक आपला विदर्भ**



**धुळे/प्रतिनिधी :** शिरपूर तालुक्यातील उमर्दा येथील चार युवक काळापाणी गावांत आपल्या मैत्रिणींना भेटण्यासाठी गेले असता काळ पाणी गावातील गावकऱ्यांनी या चौघा युवकांना संपूर्ण रात्रभर एका घरात डांबून ठेवले व त्यांना जबर मारहाण केल्यामुळे एका युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे. सदर घटनास्थळावरून युवकाला एका नाल्यात फेकून दिल्याची धक्कादायक घटना समोर आल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

उमर्दा गावातील वीस वर्षीय युवक कमलसिंग पावरा आपल्या मित्रांसोबत काळापाणी गावात आपल्या मैत्रिणीला भेटण्यासाठी गेला असता गावातील त्या मुलीच्या नातेवाईकांना संशयाला व त्यांनी या चारही तरुणांना एका घरात डांबून ठेवले. व या चारहीत तरुणांना रात्रभर बेदम मारहाण करण्यात आली व त्यानंतर उमर्दा गावातील ग्रामस्थांना यासंदर्भात माहिती दिली व आपल्या मुलांना येथून सुखरूप घेऊन जायचं असेल तर प्रत्येकी पाच हजार रुपये ची मागणी काळपाणी गावातील नागरिकांनी केली. यानंतर गावातील काही लोकांनी मध्यस्थी करत यापैकी तीन तरुणांची सुटका करून घेतली व कमलसिंग पावरा याच्या संदर्भात विचारले असता काळपाणी गावातील नागरिकांनी तो रात्रीच येथून पळून गेल्याचे सांगितले.

या घटनेनंतर उमर्दा गावातील नागरिकांनी व नातेवाईकांनी कमलसिंग पावरा यचा शोध घेतला असता तो या दोन्ही गावाच्या मध्ये असलेल्या एका नाल्यामध्ये मृत अवस्थेत आढळून आला. दरम्यान नातेवाईकांनी त्याची पाहणी केली असता कमलसिंग पावरा याला बेदम



मारहाण करण्यात आली होती व या मारहानीत त्याचा मृत्यू झाला व नंतर त्याला या नाल्यात फेकून दिलाचा संशय व्यक्त केला.

यानंतर घटनेची माहिती मिळताच शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे व यांच्या पथकाने लागलीच घटनास्थळी धाव घेत कमल सिंग पावरा याचा मृतदेह पुढील कारवाईसाठी ताब्यात घेत शिरपूर येथे पाठवला. कमल सिंग पावरा याच्या मृतदेहावर शवविच्छेदन झाल्यानंतर उमरद्या गावातील संतप्त नातेवाईकांनी कमल सिंग पावरा याचा मृतदेह थेट काळपाने गावात त्याला मारहाण करण्यात आलेल्या संशयित आरोपींच्या घरासमोर अंत्यविधी करत संतप्त नातेवाईकांनी संशयित आरोपींची घराची तोडफोड करत नुकसान केले आहे.

या संपूर्ण प्रकरणी चांगली पोलीस ठाण्यात अखेर खुनाचा गुन्हा दाखल झाला व पोलिसांनी आपली तपासाची चक्र फिरत सात आरोपींपैकी एका आरोपीला ताब्यात घेत इतर आरोपींचा शोध सुरू केला आहे.

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

**नांदेड/प्रतिनिधी :** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहिल. रविवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी नागपूर येथून विमानाने सायं.५.३५ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन. सायं. ५.४० वा. नांदेड विमानतळ येथून मोटारीने कार्यक्रम स्थळी प्रस्थान. सायं. ६ वा. राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२५ च्या समारोपीय कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ: श्री गुरुगोबिंद सिंघजी स्टेडियम, नांदेड . सायं.७ वा. श्री गुरुगोबिंद सिंघजी स्टेडियम येथून मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. सायं. ७.१५ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन. सांय. ७.३० वा. नांदेड विमानतळ येथून विमानाने मुंबई कडे प्रयाण करतील.

### शेतकऱ्यांचं सोयाबीन किंवा तूर घरी राहणार नाही याची काळजी सरकार घेईल - बावनकुळे

**दैनिक आपला विदर्भ**



**यवतमाळ/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांचे सोयाबीन किंवा तूर घरी राहणार नाही याची काळजी पुरेपूर सरकार घेत आहे आणि पुढेही घेईल अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितले आहे की, या महाराष्ट्राचा चौफेर विकास करायचा आहे. महाविकास आघाडीचे आमदार यांना देखील निधी दिल्या जाईल. महायुतीच्या आमदारांमध्ये विकास करायचा आहे. महायुती सरकारची देवेंद्र फडणवीस सरकार आमच्या सरकारची भूमिका आहे. की, आपल्या महाराष्ट्राचा सलग विकास करणे संपूर्ण विकास करणे, या महाराष्ट्र सरकारने सोयाबीनची, तुरीची नाफेडमार्फत विक्रमी खरेदी केलेली आहे. आतापर्यंतच्या वीस वर्षाच्या खरेदीमध्ये या वर्षीय सोयाबीन खरेदी सर्वात मोठी होती आणि आता तूर खरेदी सुरू झालेली आहे. कुठेही शेतकऱ्यांचे सोयाबीन किंवा तूर घरी राहणार नाही याची काळजी सरकार घेईल, असे मत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

# पळसखेड चक्का येथील पाचमुऱ्याच्या खोऱ्यातला तलाव ३० वर्षांपासून प्रलंबित

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

## आता एक तर शेतीला पाणी द्या नाहीतर पाण्यासाठी शेतकऱ्याचा बळी घ्या असा इशारा शेतकरी योद्धा कृती समिती दिला

**पळसखेड चक्का :** पळसखेड चक्का, तालुका सिंदखेड राजा येथील ३० वर्षांपूर्वी जिल्हा परिषद सिंचन विभाग यांच्या अंतर्गत पाझर तलावासाठी जमीन भूसंपादन केली असून संबंधित शेतकऱ्यांना त्याचा मोबदला सुद्धा मिळाला आहे आणि त्यांच्या ७ / १२ वर सुद्धा त्याची नोंद आहे. तरीसुद्धा संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे हलगर्जीपणामुळे पळसखेड चक्का येथील ३० वर्षांपासून तलाव प्रलंबित आहे . हा तलाव जर त्या ठिकाणी झाला तर गावातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटेल तसेच संपूर्ण शेतकऱ्याची जमीन सिंचनाखाली येईल व उगला, पिंपळगाव लेंडी,उंबरद, येथील येथील शेतकऱ्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात फायदा होईल या करीता हा तलाव अतिशय महत्त्वाचा आहे आणि लवकरात लवकर करण्यात यावा याकरिता गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही याचा पाठपुरावा करत आहे.

आमच्या या लढ्याला अद्याप यश आले नाही. या अगोदर आम्ही संबंधित विभागाला बऱ्याच वेळेस विनंती केली पण आम्हाला उडवा उडवी चे उत्तर देण्यात आले तसेच त्यावेळेसचे लोकप्रतिनिधी यांनी फक्त आश्र्वासन दिले पण अद्याप काम झाले नाही. म्हणून शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने आंदोलनाचा इशारा दिला असून संबंधित विभागाला उपविभागीय कार्यालय सिंदखेडराजा ( क ऊ ज ) यांच्यामार्फत निवेदन दिले असून तसेच सिंदखेड राजा मतदारसंघाचे आमदार श्री मनोज भाऊ कायदे आणि माजी आमदार डॉक्टर श्री शशिकांत खेडेकर साहेब यांनासुद्धा निवेदन देऊन विनंती सविस्तर चर्चा करण्यात आली.



पळसखेड चक्का येथील शेतकऱ्याच्या मागण्या आपण सरकार पुढे मांडावे आणि आम्हाला न्याय मिळून देण्यात यावा तसेच जिल्हा परिषद सिंचन विभागाने ३१ मार्च पर्यंत तलावाच्या संदर्भामध्ये वरिष्ठ विभागाला पाठपुरावा करण्यात यावा नाहीतर ३१ मार्च नंतर तलावा संबंधित विभागाने कुठलीच कारवाई केली नाही तर येणाऱ्या दिनांक १ एप्रिल पासून ज्या ठिकाणी हा पाझर तलाव होणार आहे. आणि ज्या ठिकाणी या पाझर तलावाची भिंत होणार आहे त्या ठिकाणी शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने अन्नत्याग आमरण उपोषण करण्यात येईल. याची सर्वशी जबाबदारी संबंधित विभागाची असेल अशी माहिती शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने देण्यात आली.